# महाराष्ट्र विधानपरिषद
## पत्रक भाग दोन
### गुरुवार, दिनांक ९ नोव्हेंबर, २०२३ / कार्तिक १८, १९४५ शके

१४३ लक्षवेधी सूचना स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की :-

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या गुरुवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२३ पासून विधान भवन, नागपूर येथे सुरु होणाऱ्या सन २०२३ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनासाठी द्यावयाच्या लक्षवेधी सूचना पूर्णत: एम.ओ.आय.एस. (**MOIS**) या संगणक प्रणालीवर **ONLINE** पध्दतीने गुरुवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०२३ पासून सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंन्त स्वीकारण्यात येतील.

(२) महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये द्यावयाच्या लक्षवेधी सूचनेचा विषय हा निकडीचा, सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, मुद्देसूद व एकाच विभागाशी संबंधित असणे आवश्यक आहे. तसेच लक्षवेधी सूचनेचे प्रारूप १५० ते १७५ शब्दांचे असावे.

(३) लक्षवेधी सूचना संपूर्णत: ऑनलाईन (**ONLINE**) पध्दतीने स्वीकारण्यात येत असल्याने मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार ऑनलाईन (**ONLINE**)पध्दतीव्दारे प्राप्त झालेल्या लक्षवेधी सूचनांवरील सन्माननीय सदस्यांची नावे ग्राह्य धरण्यात येतील. ऑफलाईन (**OFFLINE**) पध्दतीव्दारे प्राप्त झालेल्या लक्षवेधी सूचनांवरील सन्माननीय सदस्यांची नावे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

(४) अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वीचे कार्यालयीन कामकाजाचे पूर्ण ३ दिवस अगोदरचा दिवस हा **ONLINE** पध्दतीने लक्षवेधी सूचना स्विकारण्यासाठी अंतिम दिवस असेल.

(५) लक्षवेधी सूचना स्वीकृत करण्यासंबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेण्यासंबंधीचा संपूर्ण अधिकार हा मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचाच राहील, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ९ नोव्हेंबर, २०२३

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार)
महाराष्ट्र विधानपरिषद

..२/-

**प्रती :-**

(१) महाराष्ट्र विधानरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
(३) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
(४) मा.सचिव (१) (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक
(५) मा.सचिव (२) (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक
(६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
(७) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालय
(८) संगणक कक्ष **(WEBSITE)**
(९) एम.के.सी.एल. कक्ष **(MKCL)**